स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
# महाईन्यूज™
ePaper
। बुधवार ।
दि. 15 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# 'पीएमआरडीए' चा आशियाई विक्रम!

## ९५ दिवसांत उभी राहिली १४ मजली इमारत; 'आशिया' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गृहनिर्माण आणि अभियांत्रिकी क्षेत्रात जागतिक स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा नवा झेंडा फडकावला आहे. चिखली येथील 'सेक्टर १२' गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या ९५ दिवसांत १४ मजली इमारत उभी करण्याचा भीमकाय पराक्रम 'पीएमआरडीए'ने केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेत 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये या विक्रमाची सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यात आली आहे.**



विशेष म्हणजे, 'पीएमआरडीए'ने यापूर्वीचा आपलाच १०० दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढत बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला. सोमवारी (दि. 13) चिखली येथील प्रकल्पस्थळी आयोजित दिमाखदार सोहळ्यात 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'चे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र व पदक देऊन 'पीएमआरडीए'चा गौरव केला. प्राधिकरणाच्यावतीने मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला.

'पीएमआरडीए'चे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली हा मैलाचा दगड गाठण्यात आला. हे अशक्यप्राय काम पूर्ण करण्यासाठी 'बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी' या कंपनीच्या सुमारे ९ हजार कामगारांनी तीन शिफ्टमध्ये अहोरात्र काम केले. अत्याधुनिक 'प्रीकास्ट आरसीसी' तंत्रज्ञानामुळे (३-एस सिस्टिम – SAFETY, STRENGTH AND SPEED) गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ही इमारत विक्रमी वेळेत पूर्ण झाली. ही वास्तू पूर्णपणे भूकंपप्रतिरोधक असून शाश्वत नागरी विकासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.

यापूर्वी मार्च २०२६ मध्ये 'पीएमआरडीए'ने १०० दिवसांत इमारत बांधून विक्रम केला होता. मात्र, अवघ्या एका महिन्यात पुन्हा स्वतःचेच रेकॉर्ड सुधारत ९५ दिवसांचे नवे लक्ष्य गाठले आहे. यापूर्वी बांधकाम क्षेत्रातील दिग्गज 'एल अँड टी' कंपनीच्या नावावर ९६ दिवसांत १२ मजली इमारत बांधल्याची नोंद होती; त्यावर आता 'पीएमआरडीए'ने मात केली आहे.

यावेळी मुख्य वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, बांधकाम परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, कार्यकारी अभियंता विद्याधर शिंदे, उपअभियंता रश्मी पाटील, शिर्के ग्रुपचे उपाध्यक्ष वाय. पी. काजळे, उपमुख्य अधिकारी एन. एम. कदम, व्यवस्थापक जे. सी. राक्षे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता भिडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार एन. एम. कदम यांनी मानले.

### दृष्टिक्षेपात विक्रमी बांधकाम :

- इमारत : १४ मजली निवासी इमारत (डी-३) LIG
- एकूण क्षेत्रफळ : १४,७२२ चौरस फूट
- सदनिका : ११२ (२ बीएचके)
- कालावधी : केवळ ९५ दिवस
- तंत्रज्ञान : प्रीकास्ट आरसीसी (इंडस्ट्रियलाइज्ड ३-एस सिस्टिम)

"पीएमआरडीएच्या सेक्टर-१२ येथील गृहनिर्माण प्रकल्पात आम्ही 'मिशन ९५ डेज' हे मोठे आव्हान स्वीकारले होते. अभियांत्रिकी कौशल्य आणि अचूक नियोजनाच्या जोरावर १४ मजली 'डी-३' LIG इमारत केवळ ९५ दिवसांत पूर्ण करून आम्ही हा टप्पा गाठला आहे. ही यशस्वी अंमलबजावणी प्रामुख्याने '३-एस प्रीफॅब टेक्नॉलॉजी' 'झिरो लॅग शेड्युलिंग' आणि अहोरात्र चालणाऱ्या 'थ्री-शिफ्ट वर्किंग' मॉडेलवर आधारित आहे. या प्रकल्पात फॅक्टरी-मेड प्रीकास्ट घटकांचा वापर केल्यामुळे बांधकामाचा वेग वाढला, तसेच गुणवत्तेतही कमालीची समानता राखली गेली आणि साहित्याची नासाडी कमी झाली. बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर कडक गुणवत्ता नियंत्रण, सुरक्षा मानके आणि डिजिटल पाळत ठेवण्यात आली. हा प्रकल्प केवळ विक्रम प्रस्थापित करण्यापुरता मर्यादित नसून, भविष्यातील मोठ्या प्रमाणावरील परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांसाठी हे एक 'स्केलेबल मॉडेल' ठरणार आहे. गुणवत्तेचा दर्जा राखून सर्वसामान्यांना विक्रमी वेळेत हक्काची घरे उपलब्ध करून देणे हाच आमचा मुख्य उद्देश असून, आगामी काळातही अशा तंत्रज्ञानाधारित प्रकल्पांना प्राधिकरणाचे प्राधान्य राहील.

– **रिनाज पठाण**, मुख्य महानगर अभियंता, पीएमआरडीए.

# स्वराज्याच्या इतिहासाची छोटी वारसदार! शर्विका म्हात्रेने सर केले १७५ किल्ले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या गडकोटांवर दुर्गभ्रमंती करत रहाटणीतील अवघ्या ८ वर्षांच्या चिमुकलीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ज्योतिबा कॉलनी येथील कु. शर्विका म्हात्रे हिने तब्बल १७५ गडकिल्ले सर करत एक अनोखा विक्रम आपल्या नावावर नोंदवला आहे.**




इतक्या लहान वयात कठीण चढाई असलेले किल्ले पार करत शर्विकाने दुर्गभ्रमंतीत नवा आदर्श निर्माण केला असून तिच्या जिद्दीचे आणि साहसी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शर्विकाच्या या यशाची दखल घेत भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते विठ्ठलाची मूर्ती देऊन तिचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना काटे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गड-किल्ले हे आपल्या स्वराज्याचे सामर्थ्य असून त्यांची ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या मोबाईलच्या युगात मुलांनी अशा ऐतिहासिक आणि साहसी उपक्रमांकडे वळणे ही काळाची गरज आहे. शर्विकाचे हे यश इतर मुलांसाठी प्रेरणादायी आहे."

या गौरव सोहळ्याला उद्योजक भरत काटे, कैलास कुंजीर, निलेश कुंजीर, शैलेश कुंजीर, शर्विकाचे कुटुंबीय तसेच ज्योतिबा कॉलनीतील नागरिक आणि मान्यवर उपस्थित होते. शर्विकाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून तिच्या पुढील दुर्गमोहिमांसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# पिंपळे निलख परिसरातील पाणीटंचाई विरोधात “हंडा मोर्चा”


## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे निलख येथील विशाल नगर परिसरात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काॅग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार गजानन कामठे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होत असल्याचा आरोप करत त्यांनी प्रशासनाला दोन दिवसांत परिस्थिती सुरळीत करण्याचा इशारा दिला आहे.**






राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार
पिंपरी-चिंचवड, शहर जिल्हा
श्री. तुषार गजानन कामठे
शहराध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड शहर जिल्हा.

दिनांक : 13/04/26

प्रति,
मा. आयुक्त महोदय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे
विषय : पिंपळे निलख, विशाल नगर परिसरातील कृत्रिम पाणीटंचाई तात्काळ दूर करण्याबाबत अर्ज
महोदय,

सदर नम्र विनंती आहे की, पिंपळे निलख येथील विशाल नगर परिसरामध्ये मागील काही दिवसांपासून पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सदर टंचाई ही नैसर्गिक कारणांमुळे नसून कृत्रिमरित्या निर्माण केली जात असल्याची नागरिकांमध्ये तीव्र भावना आहे.पिंपळे निलख येथील पाणी नवी सांगवी येथे वळवण्यात येत आसल्याचे निदर्शनास येत आहे तरी माझी विनंती आहे की पिंपळे निलख हे गाव सुध्दा पिंपरी चिंचवड महानगरपालिका मध्ये आहे हे लक्ष्यात असुद्या

परिसरात नियमित पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच काही ठिकाणी टँकर माफियामार्फत जाणीवपूर्वक पाणीटंचाई निर्माण करून नागरिकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याची शंका व्यक्त होत आहे.आपण या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून, संबंधितांवर कडक कारवाई करावी व परिसरात नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करावा, ही नम्र विनंती.
तसेच भविष्यात अशा प्रकारे कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती ठोस उपाययोजना करावी.येणाऱ्या दोन दिवसांत जर पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर महानगरपालिकेवर हंडा मोर्चा काढण्यात येईल याची नोंद घ्यावी
आपल्या सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे.

आपला विश्वासू,
तुषार गजानन कामठे
शहराध्यक्ष- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड
मा नगरसेवक पिंपरी चिंचवड महानगरपालिका
९९६०९९९९९८

प्रत
पालकमंत्री,पुणे जिल्हा
पाणीपुरवठा विभाग पिंपरी चिंचवड

कामठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपळे निलख परिसरात गेल्या काही दिवसांपासून नियमित पाणीपुरवठा होत नसून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही टंचाई नैसर्गिक नसून जाणीवपूर्वक निर्माण केली जात असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

तसेच, पिंपळे निलख येथील पाणी नवी सांगवीकडे वळवले जात असल्याचेही निदर्शनास येत असल्याचा आरोप त्यांनी केला. “पिंपळे निलख हे देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत येते, त्यामुळे येथील नागरिकांवर अन्याय होता कामा नये,” असे त्यांनी स्पष्ट केले.

टँकर माफियांचा हस्तक्षेपही या टंचाईमागे असू शकतो, असा संशय व्यक्त करत कामठे यांनी संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, प्रशासनाने तात्काळ चौकशी करून नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुरू करावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, येत्या दोन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास महानगरपालिकेवर ‘हंडा मोर्चा’ काढण्यात येईल, असा इशारा कामठे यांनी दिला असून, त्यांच्या या भूमिकेमुळे प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता आहे.

> “ पिंपळे निलखमधील पाणीटंचाई ही नैसर्गिक नसून पूर्णपणे कृत्रिम आहे. नागरिकांना जाणीवपूर्वक पाण्यापासून वंचित ठेवून टँकर माफियांचा फायदा करून दिला जात असेल, तर हे अजिबात सहन केले जाणार नाही. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून दोन दिवसांत नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र ‘हंडा मोर्चा’ काढू. नागरिकांच्या हक्कासाठी कोणतीही लढाई लढायला आम्ही तयार आहोत.
>
> – तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट.

# प्रभाग ११ मध्ये जॉगर्स पार्कमधील मोकळ्या जागेवर अतिक्रमण!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रभाग क्रमांक ११ मधील जॉगर्स पार्कमध्ये उघडपणे सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने “कायद्याचा धाक उरला आहे का?” असा सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.**





चिखली मैला शुद्धीकरण केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जॉगर्स पार्कची सुमारे २५ एकर विस्तीर्ण जागा नागरिकांसाठी आरोग्यदायी श्वास घेण्याचे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. एका बाजूला एसटीपी प्लांट असून उर्वरित परिसरात गोलाकार मातीचा ट्रॅक तयार करण्यात आला आहे. रोज सकाळ-संध्याकाळ हजारो नागरिक येथे वॉकिंगसाठी येतात. एवढेच नव्हे, तर संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातून पोलीस भरतीची तयारी करणारे युवक-युवती मोठ्या संख्येने येथे सरावासाठी उपस्थित असतात.

मात्र, या सार्वजनिक ठिकाणीच आता बेकायदेशीर बांधकामांनी डोके वर काढले आहे. गार्डनच्या दोन्ही बाजूंना असलेल्या सुरक्षा केबिनमध्येही घुसखोरी झाल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. सार्वजनिक सुरक्षिततेसाठी उभारलेली ही यंत्रणाच आज अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली आहे.

नागरिकांचा आरोप आहे की, प्रभावशाली घटकांच्या पाठबळामुळे हे सर्व प्रकार सुरू असून प्रशासन जाणूनबुजून डोळेझाक करत आहे. “सामान्य नागरिकांनी छोटासा नियम मोडला तरी कारवाई होते, पण इथे उघडपणे चाललेल्या अतिक्रमणावर कोणाचा हात आहे?” असा थेट प्रश्न नागरिक विचारत आहेत.

आरोग्य, सुरक्षा आणि सार्वजनिक हक्कांशी संबंधित असलेल्या या गंभीर विषयाकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा नागरिकांचा उद्रेक अनावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जॉगर्स पार्क वाचवण्यासाठी आणि अतिक्रमण हटवण्यासाठी त्वरित कठोर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.

> “ आम्ही गेल्या अनेक महिन्यांपासून या अनधिकृत बांधकामांविरोधात तक्रारी करत आहोत, पण प्रशासनाकडून कुठलीही दखल घेतली जात नाही. जॉगर्स पार्क हे आमच्यासाठी केवळ फिरण्याचं ठिकाण नाही, तर आमच्या आरोग्याशी आणि दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. इथेच आमची मुलं पोलीस भरतीची तयारी करतात. पण आता अतिक्रमणामुळे सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. प्रभावशाली लोकांच्या दबावामुळे कारवाई होत नाही का, असा संशय येतो. जर प्रशासनाने तात्काळ पावलं उचलली नाहीत, तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.
>
> – स्थानिक नागरिक.

# आजच्या पिढीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आचरणात आणणे ही काळाची गरज : महापौर

## महानगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा विचार हा आपल्या संविधानाचा पाया आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या मंत्रामुळे समाजात परिवर्तन घडले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांना केवळ स्मरणात न ठेवता आचरणात आणणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



### एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने अनोखी मानवंदना

पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने हेलिकॉप्टरच्या माध्यमातून भव्य पुष्पवृष्टी करण्यात येत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखी मानवंदना देण्यात आली. आकाशातून होत असलेल्या या पुष्पवृष्टीमुळे परिसरात उत्साहपूर्ण आणि भारावलेले वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित नागरिकांनी या अनोख्या उपक्रमाचा मोठ्या उत्साहात साक्षीदार होत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला अभिवादन केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस, भीमसृष्टी तसेच एच. ए क़ॉलनी आणि दापोडी येथील पुतळ्यास महापौर रवि लांडगे तसेच महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

विविध ठिकाणच्या या अभिवादन प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन,कुशाग्र कदम, डॉ. सुहास कांबळे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, माई काटे, वर्षा जगताप, यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या कार्याचा जागर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ११ ते १७ एप्रिल या कालावधीत ‘सामाजिक समता सप्ताह’ आणि ‘विचार प्रबोधन पर्व’ आयोजित करण्यात आले आहे. या पर्वाच्या माध्यमातून महापुरूषांच्या विचारांचा प्रसार करून समाजात जागर निर्माण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या उपक्रमांमध्ये शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन समता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारी यांचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन देखील महापौर रवि लांडगे यांनी यावेळी केले.

यावेळी महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करून अभिवादन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अवघ्या विश्वाला प्रेरणादायी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी सामूहिक अभिवादन व सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार नव्हे तर त्यांनी अवघ्या जगाला समतेचा, आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचा संदेश दिला, जो अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.**



असा विश्वास शहर सुधारणा समिती सदस्य तथा विद्यमान नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी यनिमित्ताने व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन तसेच पिंपरी चौक येथील भिमसृष्टी याठिकाणी आयोजित मुख्य अभिवादन कार्यक्रमात महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, तसेच सर्वपक्षीय नगरसेवक नगरसेविका, पदाधिकारी यांच्या समवेत नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी महामानवांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी सामाजिक समता सप्ताह कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरात आलेल्या भीम अनुयायी व नागरिकांसाठी विविध सेवाभावी संस्था व संघटनांच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांना भेट देण्यात आली. मोफत पाणी वाटप, सरबत वाटप, आरोग्य तपासणी शिबीर आदी स्टॉलचे उद्घाटन डॉ. सुहास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वही–पेन संकलन समितीच्या अभिनव उपक्रमात सहभागी होत विद्यार्थ्यांसाठी वह्या व पेन भेट देण्यात आले.

> “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समता, न्याय व बंधुतेचे विचार आजच्या काळात सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, येत्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला सर्वसमावेशक देश घडविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. या निमित्ताने सर्व नागरिकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मंगलमय शुभेच्छा व्यक्त करतो.
>
> – **डॉ. सुहास कांबळे,** सदस्य शहर सुधारणा समिती, विद्यमान नगरसेवक पिं. चिं. मनपा.

### विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना उपस्थिती

प्रभाग क्रमांक ८ मधील बालाजीनगर येथे युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य भीमजयंती मिरवणुकीत डॉ. सुहास कांबळे सहभागी झाले. त्यानंतर भिमरत्न प्रतिष्ठान व तथागत बुद्धविहार येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून आयोजक व कार्यकर्त्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# 'मास्टर' होण्यासाठी रियाज, सातत्य अत्यावश्यक

## आकृती प्रदर्शनात कांबळे यांना डी वाय पाटील जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कोणत्याही क्षेत्रात “मास्टर” होण्यासाठी “रियाज” आणि सातत्य,आणि एकाग्रता असणे अत्यावश्यक आहे.कला ही भावनेशी जोडलेली असल्याने स्वतःला झाकून काम केल्यास उत्तम कलाकृती निर्माण होते. असे सांगून तंत्रज्ञानाने किती ही प्रगती केली तरी नवनिर्मितीसाठी कौशल्याला कधीचं कोणताही पर्याय नाही व तसेच भविष्यातही नसेल, असे मत जेष्ठ शिल्पकार प्रमोद कांबळे यांनी व्यक्त केले.**



आकुर्डीच्या डॉ डी वाय पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीतील स्कूल ऑफ अप्लाईड आर्ट अँड क्रॉफ्टसच्या वतीने भरविण्यात आलेल्या “आकृती” चित्र प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी प्रमोद कांबळे यांना डी वाय पाटील जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

५१ हजार रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समारंभाला जाहिरात कलादिग्दर्शक महेश घरत, चित्रकार पराग बोरसे, कुलगुरू प्रा. मनिष भल्ला, मुख्य वित्तीय अधिकारी बिपीन शर्मा, कुलसचिव डॉ. बिरान मोईदीन, डॉ माधवी देशपांडे, डॉ अनुपमा पाटील, डॉ मधुरा जगताप, स्कूल ऑफ अप्लाइईड आर्टस् अँड क्रॉफ्टचे संचालक जयप्रकाश कलवले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्कूल ऑफ अप्लाईड आर्ट अँड क्रॉफ्टस च्या २२५ हून अधिक उपयोजित कला विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे ‘आकृती’ प्रदर्शनाचे उद्‌घाटन कलादिग्दर्शक महेश घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कला प्रदर्शनामुळे विद्यापीठातील वातावरण उत्साहवर्धक व आल्हाददायक झाल्याचे सांगत कुलगुरू प्रा मनिष भल्ला यांनी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले.

डी वाय पाटील प्रतिष्ठान चे वित्त-लेखाधिकारी बिपीन शर्मा म्हणाले की, आज च्या घडीला कला हे नुसते सजावटीचे माध्यम राहिले नसून, सुसंवाद व प्रेरणादायी स्तोत्र ही ठरत आहे कारण कलेद्वारे असंख्य प्रश्न ही सहज सुटू शकतात हे सिद्ध झालेले आहे. यावेळी सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार यश शेवाळे याला देण्यात आला. वर्गनिहाय विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदर्शन समन्वयक डॉ नितीन तावरे, शरद वडकर, राजेश पुजारी, अध्यापक वृंद प्रा. शंकर आडेराव, डॉ. राहुल वेलदोडे प्रा. पल्लवी पांढरे, प्रा सुरभी गुळवेलकर, प्रा. कृष्णा सावंत, प्रा. श्याम पगारे, प्रा. विजया लक्ष्मी, प्रा संकेत भलारे, एम एल जगदाळे, अमेंद्र देशमुख, दर्शना गायकवाड, स्नेहल मगरे, अमोल हरगुडे, जगन्नाथ चौगुले व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

डी वाय पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या कलादालनात आकृती हे विद्यार्थ्यांच्या कलाकृतीं चे प्रदर्शन दि. ११ ते १८ एप्रिल पर्यंत स १० ते सायं ७ वाजेपर्यंत कला रसिकांसाठी विनामूल्य खुले असल्याची माहिती स्कूल ऑफ अप्लाइड आर्टस् अँड क्रॉफ्टचे संचालक जयप्रकाश कलवले यांनी दिली. सूत्रसंचालन कु. क्रिन्जल जैस्वाल केले तर आभार कु. सारथा राजकुवर यांनी मानले.

# प्रियदर्शनी स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सँडविक कॉलनी, भोसरी येथील प्रियदर्शनी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली. ‘शिक्षण हे अन्यायाविरुद्ध लढण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे’ हा बाबासाहेबांचा विचार केंद्रस्थानी ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**





कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी ‘बौद्ध वंदना’ आणि ‘भीम गीतांचे’ गायन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील संघर्ष, त्यांचे शैक्षणिक विचार आणि संविधानाचे महत्त्व यावर अभ्यासपूर्ण भाषणे सादर केली. शिक्षकांनी आपल्या मार्गदर्शनातून बाबासाहेबांनी दिलेल्या “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” या मंत्राचा अवलंब करण्याचा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनी याप्रसंगी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित छोटेखानी नाटिका आणि कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अन्यायाविरुद्धचे शस्त्र बनवले. आजच्या पिढीने तोच विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.”

कार्यक्रमाच्या शेवटी सामुदायिकरीत्या भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. या सोहळ्याला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर ‘जय भीम’ आणि ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो’ या घोषणांनी दुमदुमून गेला होता.

> डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे सर्वात मोठे शस्त्र मानले होते. प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये आम्ही केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांमध्ये बाबासाहेबांच्या याच विचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या स्पर्धात्मक युगात प्रगत शिक्षण घेऊन एक जबाबदार नागरिक बनणे, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.
>
> – डॉ. जितेंद्र इंद्रमन सिंग, व्यवस्थापकीय विश्वस्त, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्स.